
९८६३
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९६२८

# धरतीमाता



REFBK-0013491
REFBK-0013491

अमरशेख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम ३६०५५ वि: काव्य.
क्रमांक १६२८ नों दि: १८/८/६७

# धरतीमाता

REFBK-0013491
REFBK-0013491

अमर शेख

किंमत दोन रुपये

अ भि न व प्र का श न, मुं ब ई १ २

प्रकाशक :
**वामन विष्णु भट**
**अभिनव प्रकाशन,**
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड,
परळ, मुंबई १२

●

प्रथमावृत्ति : २० ऑक्टोबर १९६३

●

चित्रकार : **बाळ ठाकूर**

●

© सौ. ज्योति अमर शेख, बी. ए.

●

मुद्रक :
**चिंतामण वामन जोशी**
**माधव प्रिंटिंग प्रेस**
अलिबाग–कुलाबा.

अनुक्रम :

एकच दाणा
पेटत नाहींत कशीं हीं मनें
भारतरत्न कर्वे यांसी
जलधारांनो
ढोंगी
धन्यवाद
पाथरवट
एकच ठेविन
मंथन
नवे संत
झोंपा रे बाळांनो
अज्ञानाचें मत
तारकेची कथा
नवसंस्कृति
शुभ्र खेकडे
प्रयोग
लोकलमध्यें
पाव शतक
माझा देहचि धरतीमाता
कर्ण आणि कुंती
तुझा नखरा बघून पांखरा
आशादीप
कापसाची कहाणी
कलावतीस
मोळीवाली

भरल्यापोटीं
चक्र मनाचें
काड्याच्या माड्या
क्षयानें मेली बाबूची बहीण
क्षमा करा मत्प्रिय चिमण्यांनो
मन माझं हिरवं गार
मी मीन वेगळा जळाविणा
असा हा उंदीर असा हा धनिक
वेडी आई
बर्फ पेटला
आपलें धोतर सांभाळी बा
सत्याचे गा ओझे
खंडाळा
गध्याचेही धरिन पाय मी
माय माझी आहे मरहट्टी
सून सुभेदाराची नाचुं द्या
तुफानांत
निर्मिती पाठीं
रूमानियन कमलिनीस
अंकगणित
माझी आई

दा. क्र. १३५११

# सत्य—

माझी कविताच काय पण माझा एक शब्द देखील बक्षिसाच्या वा तत्सम रुपेरी, सोनेरी प्रलोभनाकडे बघून अथवा भाळून लिहिला गेलेला नाहीं. याचा मला सदा अभिमान वाटतो.

प्रलोभनानं माणूस मिंधा नि लाचार बनणं अपरिहार्य आहे. त्याच्या काव्याची, कलेची धार बोथटणं सहज शक्य आहे. आणि आम्हां कवींना, कलावंतांना तर लाचारी, आणि मिंधेपणाइतकं लांछन जगांत दुसरं कुठलंही नाहीं. मग तें प्रलोभन प्रोत्साहनाच्या वा आणखी कुठल्याही गोंडस नांवानं आमच्या जीवनांत येवो.

प्रलोभनामागेंच मोहमयी अधःपाताची दरी आहे. माणूस एकदां मोहांत लोभांत, जाळ्यांत सांपडला रे सांपडला कीं मग तदंगभूत आडाखे, ठसे, निर्बंध हे आलेच. कवीला बांध हवा, जरूर हवा; पण तो चंद्र, सूर्य, निसर्गाला आहे तसा निर्मोह, निर्लोभ असावा.

अर्थात आजचं जग पुढारलेलं, डिप्लोमसीचं, मुत्सद्देगिरीचं. या जगांत अशा दरीला, अधःपतनालासुद्धां कुठल्यातरी महान् तत्वाची झिलई चढवून मोक्षाचं, मुक्तीचं तीर्थ बनविण्यांत येतं, कलेसाठीं कला, केवळ आनंद, केवळ सौंदर्याच्या झिरमिळ्या त्या अधःपतनावर सोडण्यांत येतात. गूढतेची वलयं अंवती भोंवती फैलावून व्यक्तीच्या दंभ, अहंकाराला प्रोत्साहन दिलं जातं. आणि मग त्यामुळंच प्रलोभन, मोहाला बळी पाडणारी, बोटचेपी वृत्तीची व स्वतःचं एक वेगळं जग असल्याची शेखी मिरवणारी जमात तयार होते. तिचे अलिखित नियम, बंधनं, तयार होतात. त्या जगांत असणारेच फक्त कवि-साहित्यिक; त्या बाहेरचे सगळे गद्य- सामान्यजन, अतएव हेटाळणीयोग्य मानव.

खरोखरीच सामान्य जनांपासून दूर असलेल्या या मराठी भाषिक कविजनांनीं आपली स्वतःची एक जात तयार केलेली असून, त्या जमातीबाहेरचा माणूस ते शक्यतों आपल्या मध्यें घेत नाहींत. कवितेला सामान्य जनापासून दूर ठेवण्याचा ते सतत प्रयत्न करतात. यामुळेंच मराठी कवितेचे क्षेत्र अतिमर्यादित केलें गेलें आहे. उभ्या महाराष्ट्रांतील तथाकथित अव्वल दर्जाचे एकूण एक कवीजन एकत्रित करून, हवा तेवढा गाजावाजा करूनही श्रोतृवर्ग जमा केला तरी तो मुंबईसारख्या ठिकाणींही जेमतेम एक हजारापर्यंत कसातरी जातो. त्याच महाराष्ट्राच्या या राजधानींत उर्दू कवींचा मुशायरा बारा बारा हजारापर्यंत लोक जमून शेंकडो हजारों रुपयांची उलाढाल करून ‘ शानदार ’ पणें पार पडतो.

ही लाजिरवाणी परिस्थिति उघड्या डोळ्यांनीं मराठी माणसाला पहावी लागते.

यावर आमच्या या बुद्रुक कवि महाशयांचे विचारही मोठे ‘ अजीब ’ असतात. म्हणे उर्दूचे सर्व श्रोते ढोंगी असतात. त्यांच्यात ‘ वाहव्वाबाजी ’ असते. ते सर्व एका विशिष्ट धर्मांचे असतात.

या त्यांच्या बचावांत आत्मप्रौढीशिवाय काय आहे ? श्रोतृवर्ग हाताच्या बोटावर मोजण्यासारखा असला तर माणसाला प्रसंगीं आपल्यांत नसलेल्या रसिकतेचं प्रदर्शन करतां येतं. पण हजारो माणसांत कोण कुणाला फुटपट्टी लावीत बसतो ? आणि उर्दूचा प्रेक्षक एकाच धर्माचा असतो हेंही सत्याला धरून नाहीं, असा माझा अनुभव आहे. कलकत्त्यांत उर्दू मुशायऱ्यासाठीं तिकीट काढून आठ हजाराचा जमाव आला होता, त्यांत कवि नियाज हैदर यांच्या कवितेवर पांच हजार रुपयांचा चेक प्रेक्षक समूहांतून देणारा माणूस हा आमचे कवि महाराज समजतात याहून भिन्न धर्माचा होता. आणि कांहीं असलं तरी या मुशायऱ्यातून कांहीं धार्मिक कवनं पढली जात नाहींत. तर त्या मुशायऱ्यांतून उच्च वाङ्मयीन मूल्येंच सर्व प्रथम शिरोधार्ह मानलीं जातात. कानपुरी हिंदीचा मुशाहिराही अशाच वैभवात पाहिला, ऐकिला, पण या गोष्टींचा आमचे कविबांधव कधीं सम्यक् दृष्टीनें विचारच करीत नाहींत. इतकेंच नव्हे तर कुठलाही नवा विचार वा व्यक्ती ही तथाकथित उच्चभ्रू मराठी कवि मंडळी, मराठी कवितेच्या दालनांत रिघूं देत नाहींत. ती तशी जवळपास फिरकूं लागली रे लागली कीं

ती एक तर अनुल्लेखानें टाळायची, त्यांची टवाळी कुचाळी करायची किंवा साहित्यांतर्गत मूल्य आणि साहित्यबाह्य मूल्य या विषयींचे स्वतःच निर्माण केलेले कोडे अंथरून ठेवायचे, अथवा कुढ्यारड्या मानवाच्या अंतःमनांतील अंतर्गत कप्प्यांतील, अव्यक्त सुप्तावस्थेंतील संवेदनशील पण सूक्ष्म असा प्रचंड संज्ञाप्रवाह असले, नाना तऱ्हेचे अर्थहीन प्रश्न उभे करून त्यांचा बाऊ करायचा; येनकेन प्रकारेण आपल्याशिवाय अन्य कोणी या काव्य क्षेत्रांत शिरकूं फिरकूं नये इतकें घाबरवून सोडायचे, गुदमरून टाकायचे. बरें यांच्याशी चर्चा करावी तर तीहि निरर्थक. यांना कुणी म्हटलं, ‘ अहो तुमच्या कविता दुर्बोध वाटतात ’, तर उत्तर मिळतें, ‘ मग तेच तर आमचं वैशिष्टय आहे. ’

विचारिलं जातं, ‘ आणि काय हो, बोध आणि तात्पर्य सांगत बसायला काय आम्हीं शाळा मास्तर आहोत ? ’

‘ अहो, तुमची कविता सामान्य जनांना आकलन होत नाहीं. त्यांची पातळी...’

भाष्यकाराच्या तोऱ्यांत उत्तर येतें, ‘ हवं तर लोकांनीं आमच्या पातळीत यावं.’

‘ अहो तुमची कविता सामान्य जनांना वाचावयाची आहे...’

प्रेषिताच्या डौलांत उत्तर मिळतें, ‘ अहो आमची कविता सामान्यांसाठीं नाहींच मुळी, ती समजायला आईन्स्टीन, रसेल हवेत.’

‘ पोकळ वासा ’ असलेली ही घमेंडखोर वृत्ति...मला तरी याचा चांगला अनुभव आहे. मध्यंतरी तर यांनीं जवळ जवळ एक पीठच निर्माण केले होते. गिरगांवांतल्या एका बोळांत. पण मराठी जनतेनं त्यावर इतका बहिष्कार घातला कीं तें पीठ अल्पावधींत आपोआप बंद पडलें.

तरीपण यांचे डोळे उघडले नाहींत. हें असें कां घडते याचा विचार कधीं या महाभागांनीं केला नाहीं. या सर्व गोष्टीमुळें कांहीं मराठी कवींना प्रथम पुढें येतांना आपल्या अंगावर बायकी वस्त्र चढवून (स्त्रीलिंगी नांव घेऊन ) अथवा कधीं मधी वाम मार्गांचा अवलंब करून पुढें सरकावें लागलें. यांच्या आशयांत तरी कांहीं नाविन्य असते का ? तर तेही नाहीं. त्याच त्याच बुरसटलेल्या प्रेमाच्या लंपट गोष्टी पुनः पुनः उगाळून लोकांना अट्टाहासाने पाजणें, वैयक्तिक

सुख दुःखाचें दळण रेंकत बसणें हेंच या उच्चभ्रूंना अगत्याचें वाटतें. मानवी जीवन व त्याचे काव्य हें यापुरतेच मर्यादित करून ठेवले आहे या लोकांनीं. मानवाच्या जीवन जगण्याविषयींच्या कल्पना, ती धडपड, ती जीवनाभिमुखता, मानवतावाद व्यर्थ वाटतें सारे यांना. जनता जीवन यांना ते टाळतातच, इतकेंच नव्हे तर जें जन-जीवन हा साहित्य, कला, वाङ्मयाचा पाया, त्या पायाचाच हे लोक धिक्कार करतात.

ठाणे जिल्हा साहित्य परीषदेच्या शहापूर येथील भाषणांत या उच्चभ्रू वर्गाचे म्हणवून घेणारे एक साहित्यिक श्री. पु. भा. भावे यांनी अध्यक्ष या नात्यानें प्रतिपादिलें होतें, 'जनते, तूं महामूर्ख आहेस, अज्ञानी आहेस, जनतेसाठीं वाङ्मय हें घोषवाक्य फसवे आहे.' याच पु. भा. भाव्यांनीं 'हिंदू' सासाहिकांत 'बेडेकराचा लाल मसाला' लेख लिहून 'शेख मिय्याँना' कवि म्हणूं नका असा आदेश दिला होता. एका बाजूला साऱ्या महाराष्ट्रांत मी कवि म्हणून ओळखला जातों. अगदीं स्वा. वीर कवि सावरकरही मला कवि म्हणूनच उल्लेखितात, तर पु. भा. भावे सारखे साहित्यिक मिरासदार मला बाहेर फेका म्हणून सांगतात, इतकेंच नव्हे तर त्यांच्यासारख्याकडून मला जातीधर्म वाचक 'मिय्याँशेख' हें विशेषण बहाल करण्यांत येऊन हिणवले जातें.

मुसलमानापोटीं मी जन्माला आलों याचा मला कधीं अभिमान, तसा विषादही वाटला नाहीं. मी माझ्या कृतीवर विश्वास ठेवणारा माणूस आहे. माझ्या जीवनाचा फार मोठा काल मी कवितेलाच वाहिला. तेव्हां माझ्या कवितेचं नीट मोजमाप होऊन मला योग्य मार्गदर्शन व न्याय मिळावा अशीच माझी प्रथमपासून अपेक्षा.

माझी कविता रांगडी आहे अन् ती रांगडीच असणार, कारण तिची पिंड प्रकृतीच तशी आहे. तरी पण वाटतं, कीं कुणीतरी तीवर बोलावं. कुणीतरी कान पिरगाळावा. कुणीतरी थोपटावं. मी या आधीं 'कलश' नांवाचा कविता संग्रह जनतेहातीं दिला. आचार्य अत्रेनीं प्रस्तावना कौतुक भरल्या अंतःकरणानें लिहिली. तें माझ्या कवितेचं अमर लेणं असल्याचं आजही मराठींतले मर्मज्ञ पंडित मानतात. वर्तमानपत्री टीकाकारांनीं अतिशय चांगली दखल घेतली, पाठ थोपटली, प्रेमानें कानही पिरगळले. नागपूरच्या 'तरुण भारता' नें 'राष्ट्रशाहीर

अमर शेख यांचा काव्य-कलश ' म्हणून गौरवून ' ध्येयवादाच्या स्फुल्लिंगांतून उफाळलेली अंगार-गीतें असें म्हणून कवितेंत अमृत सिंचनाची प्रतीति आली ' असें म्हटलें. मराठी जनतेनें तर अमाप प्रेमाचा वर्षाव केला. पण या उच्चभ्रू कवि, साहित्यिक मिरासदारांनीं अन्याय, अवहेलने शिवाय दुसरे कांहीं दिलें नाहीं. उदाहरणादाखल तीन साहित्य संमेलनांतील काव्य गायनाचे कार्यक्रम मला दाखवतां येतील.

औरंगाबाद साहित्य संमेलनास मी एक साहित्यिक कवि म्हणून खास संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावासाठीं उपस्थित होतों. उच्चभ्रू मिरासदार कवींना आमंत्रणें होतीं. मला नव्हतें अन् मी तर हजर होतों. जमलेल्या श्रोतृवर्गानें माझ्या नांवाचा आग्रह धरला. मला आमंत्रण नसल्याचें लोकांना कळलें. लोकांना चीड आली. चिटणीसांनीं लोकांची माफी मागून लोकांच्या इच्छेखातर मला त्या कविसंमेलनांत भाग घेण्यासाठीं आवाहानिलें. मी काव्यगायनांत भाग घेतला व शेवटीं परिषदेनें खर्चही दिला, ही गोष्ट वेगळी. पुन्हां तीच गोष्ट मालवण साहित्य संमेलनाची. तिथेंही मी संयुक्त महाराष्ट्राच्या ठरावासाठींच गेलों होतों. तिथेंही श्रोतृवर्गानें औरंगाबादप्रमाणेंच माझ्या काव्य गायनासाठीं गहजब केला व तिथेंही औरंगाबादप्रमाणें संमेलन सेक्रेटरींनी माफी मागून काव्य गायनासाठीं विनविलें. शेवटीं मीही भाग घेतला. मला वाटलें, आतां तरी या बड्या मंडळींकडून मजवर अन्याय होणार नाहीं. पण छे. सातारा साहित्य संमेलनांतही अगदीं तेंच घडलें. तोच जनतेचा आग्रह, तीच चिटणीसांची माफी. तेंच तेंच, अगदी तेंच. पण हे सारें लोकमतापुढें नमूनच. स्वतः होऊन नाहीं. काय म्हणावें याला ? अशा अनेक काव्य गायनाच्या कार्यक्रमांत माझी कविता अग्रेसरत्वानें उजाळून निघाली. केवळ गायकीवर मी आघाडी मारली असें कुणालाही म्हणतां येणार नाहीं. माझ्या काव्यांत काव्य मूल्यें नसती तर या चोखंदळ काव्य रसिकांनी क्षणांत मला भिरकावून फेंकून दिलें असतें.

' लोकमित्र ' कार आपल्या २-२-५९ च्या अंकांत म्हणतात, ' त्या मानानें कवि अमरशेख हे बापट प्रभृति तरुण कवींच्या बरोबरीचे असूनहि महाराष्ट्र शारदेच्या दरबारांतील काव्य विभागांत कोठेंतरी मागल्या रांगेंतच घुटमळताहेत, त्या दरबारांतील सन्माननीय आसन त्यांना अजून प्राप्त झालेलें

दिसत नाहीं.' हें वाचून माझे कांहीं मित्र मला म्हणाले, 'अमरशेख! तुम्हीं उच्च ब्राह्मण कुलोत्पन्न नाहींत हाच तुमचा खरा दोष.' मला हें पटले नाहीं. मी त्यांना सांगितले, 'या लोकमित्राचे संपादक श्री. एस्. एम्. जोशी हे उच्च कुलोत्पन्नच आहेत ना? त्यांच्या पत्रांतीलच हे विचार आहेत ना? कवि आचार्य अत्रे, कुसुमाग्रज, सोपानदेव चौधरी, ग. दि. माडगूळकर हे तरी कुठं मजप्रमाणें हीन कुळांत जन्मले आहेत? ग. दि. माडगूळकर सारख्या मान्यवर कवीला जिथें केवळ 'गीतकार' म्हणून हिणविलें जातें, तिथें माझ्या उच्च नीच कुळाचा प्रश्न काय? यांत एकच गोष्ट खरी आहे आणि ती सांगायची म्हणजे मराठी साहित्य वाङमयाच्या क्षेत्रांतील (सरंजामदारी अवशेषांची) पुरोहित वर्गाची मक्तेदारी काडीइतकीहि कमी झालेली नाहीं. म्हणूनच जीर्ण शीर्ण मूल्यांची इथें जोपासना होते व नवोदित मानवतावादी, समाजनिष्ठ मूल्यांची अवहेलना होते.

इतकीं वर्षें महाराष्ट्रासमोर मी कवि म्हणून उभा आहें. माझी न् माझ्या सारख्यांची ही स्थिति आहे. नवागतांची, इतरे जनांची काय स्थिति असेल?

खरं म्हणजे या काव्यक्षेत्रांतील मिरासदारांनीं एक मोठा कोट बांधून भक्कम जाळंच उभं करून ठेवलं आहे आपल्या भोवती. बडवेगिरीचं हें जाळं मोठं नमुनेदार आहे. स्थलाभावी तें मी सांगत नाहीं.

फार विचित्र अनुभव आहेत गाठीशीं माझ्या. ही गोष्ट खरी आहे कीं या तथाकथित उच्चभ्रू कवींच्या जातीपेक्षां मी वेगळा आहे. पण मीच एक वेगळा नाहीं. अनेक नवागतच नव्हे तर मजसारखे कांहीं जुने कवीही वेगळे आहेत. आम्हां सर्वांचं वेगळेपण हें एकमेकांपासून पुष्कळ अंशानं भिन्न आहे. पण तरीही आम्हीं सर्व वेगळे आहोत, हे खरंय्.

माझं वेगळेपण—माझी कविता ही माझ्या समाजजीवनाला जबाबदार अशा सामान्य माणसाच्या जीवनांतच जन्मली आहे. मला वाटतें, प्रचंड विध्वंसक सामाजिक मनःस्थितीच्या; भयानक अशा वैचारिक गोंधळाच्या; आर्थिक आपत्तींत सांपडून चक्काचूर होणाऱ्या मानवी जीवनाच्या; पण तरीही अंतर्मुख होऊन धडपडणाऱ्या अशा एका वेगळ्याच कालखंडामधील वादळांतील पाचोळ्यागत गिरक्या खात भिरभिरणारा मी एक कलावंत कवि माणूस आहें.

भयावह संघर्ष मजपुढून सरकतो आहे, धक्के देतो आहे. उलथापालथी होत आहेत आणि बदल होत आहेत. एके काळीं महिन्याचे रोजे (उपवास) करून पंचगाना (पांच वेळा) अल्लाला साद घालणारा मी—समाजवादाची बुद्धिवादी सावली माझ्या नमाज, रोज्यावर पडलेली मी पाहिली. दुनिया पादाक्रांत करूं पहाणारा हिटलरवाद पहिला. दुसऱ्या महायुद्धाच्या अवघें जीवन ग्रासून टाकणाऱ्या झळा पाहिल्या, साहिल्या. श्रमजीवी वर्गाची सत्ता प्रस्थापित झालेली, विस्तारित होत असलेली पाहिली. पिळणुकीचा पाया असलेली जगांतील भांडवलशाही बाजारपेठ अस्तंगत होत असलेली पाहिली. पडेल तें काम मिळवून दुपारची भ्रांत मिटविण्यासाठीं जिवाचा आटापिटा केला. त्याच माझ्या श्रमावर जगून मजवरच कुरघोडी करणारा मी पाहिला.

संस्थानिकांचा नेत्रदीपक विलास पाहिला. त्या विलासाच्या उपभोगांत पिचत पडलेली, सडत असलेली, नैतिक मूल्यें पाहिली. नफ्यासाठीं उत्पादन स्वीकारणाऱ्या देशांतील व्यक्तिगत सुखाच्या एव्हरेस्टबरोबर सामाजिक दुःखाची परिसीमा माझ्याच या खंडप्राय भारतांत मी पाहिली. साम्राज्यवाद्यांनीं जाता-जातां पेटवलेल्या दंग्यांत रक्ताचा (मुस्लिम) भाऊ मरून पडलेला पाहिला. वर्गांत एका लंगोटीनं वावरलेला जिवश्च कंठश्च (हिंदू) बंधू रक्ताच्या थारोळ्यांत पडलेला पाहिला. ॲटम, हैड्रोजन सारख्या विध्वंसक बॉंबची उत्पत्ति पाहिली. हेलसिंकीचा प्रेमळ अंतःकरणाचा पण...जगीं मानवी युद्ध नको रे...हें गर्जून सांगणारा स्वाभिमानी भंगी पाहिला. विज्ञानावर मात ठरणारी निकोलाय-पोपोविच यांची मानवी जीवनांतली गगन भरारी तर खुद्द मास्कोमधून बारकाव्यासह पहायला मिळाली.

स्त्री मानव शक्ती निम्मी होती दासी
ती हात घालते आज पहा गगनासी

हें भाकित व्यक्त करून आपल्या 'कलश' या काव्य संग्रहामधून रंगव-लेले स्वप्न वॅलेंतिनानें (कालच्या अबलेनें) साकार केलेले पाहिले. कवींच्या लाडक्या चंद्रावर मानवानें रोवलेली ध्वजा पाहिली. वर्ण द्वेषानं भाजून, होरपळून निघाल्यामुळं अंतराळांतील पाकोळ्यागत भिरभिरणारी 'काळी माणसं' आफ्रिकच्या जंगलांत स्वतंत्र होत असलेली पाहिली. ज्ञानेश्वर, तुकयाची समर्थ वाणी

ऐकली– नव्हे, त्याच्या मानवतावादी प्रकाशांतच माझें सारें बाल्य उमललें, केशवसुतांच्या तुतारीनें मला उभे केले. बाल कवींच्या फुलराणीनें रिझविलें. फुलें पाहिलीं, विरहाकुल कमलिनी पाहिली, प्रेमानें अक्षरशः वेडा होण्याची धुंद अवस्था अनुभवली, आणि त्याच अवस्थेंत झालेला प्रेमभंगाचा जबरदस्त तडाखा साहिला. गाढवाइतके कष्ट उपसले, आणि कीर्ति शिखरावरील तृप्तीची धुंदीही अमूप लाभली. सुख, दुःख, सौंदर्य, नरक सर्व–सर्व कांहीं पाहिलं, साहिलं.

पण खरं सांगायचं म्हणजे सुखापेक्षां दुःख–दुःखच खूप पाहिलें. श्री. विंदा करंदीकर यांनीं आपल्या एका कवितेंत म्हटलें आहे, 'असं कांहीं पाहिलं आहे कीं ज्यानें मी दुभंगलो.' अगदीं असंच दुभंगण्याइतकं मी पाहिलं. आणि जगांतील बहुशः सगळे विचारवंत आज याच एका चिंतेंत आहेत कीं हें सांधायचं कसं ? या विचारवंतांतून कोणीही असा राहिलेला नाहीं कीं जो 'वरून' येणाऱ्या एखाद्या प्रेषिताची वाट पाहील. नव्हे– प्रत्येकाची तळमळ आहे, की मानव समाजाचे शारिरिक, मानसिक उध्वस्तीकरण थांबलेच पाहिजे. आपल्याला समजेल एवढा व समाजाला झेपेल एवढा कर्म योग समाजांत बाणवलाच पाहिजे, हा एक सृजनशील विचारप्रवाह आज सर्वत्र वाहूं लागला आहे. पण त्याचा एक लक्षांश, कोट्यांशही माझ्या कवनांत उमटला नाहीं, तरी संसारांतील दुःख नाहीसं व्हावं म्हणून जीवाची कासावीस मात्र चालू असते सारखी. काय करावं म्हणजे हे सर्व नाहीसं होईल व मानवाला हवं ते मिळेल, याच प्रश्नाची घालमेल सतत चालू असते मनांत. त्यांतून सुटणारे शब्दच काव्यरूप घेत असावेत. आणि मग वाटतं असं कीं माझी कविता निबिड अंधःकारांतील, घनदाट अरण्यामधील एक साधी पाऊलवाट आहे. माझ्यासारख्याच्या मागून येणारे आणतील 'स्वकरें ज्ञानसूर्याला ओढून.' करतील या पाय वाटेचा राजमार्ग. लावतील साऱ्या दुःख दैन्याला आग. आणि फुलवतील या जीवनाची सुंदर बाग.

या सर्व गोष्टींचा ठसा माझ्या कवितेंत पडणं अपरिहार्य आहे.

काव्य म्हणजे सत्याकडे जीवनाची ज्वलंत आणि अव्याहत अशी धांव असं मी समजतों. सागर सत्य आहे. जीवन प्रवाह आहे. प्रवाहाला सागराची ओढ नैसर्गिक असणार. कारण ते 'एकरूप' आहे. म्हणून जीवनही पण

सत्यच आहे. हें जीवन अविरोध हक्कानें आणि मानानें जगायला मिळावें म्हणून घेतली जाणारी धांव, अभिलाषा म्हणजेच मानवाची स्वातंत्र्याकांक्षा हीही सत्य आहे. आणि म्हणूनच मी या सत्याचा पुरस्कार करणार. या स्वातंत्र्याकांक्षेंत काव्य नाहीं असें म्हणणाऱ्या मुर्दाडांतला मी नाहीं.

कवि काय किंवा शाहीर काय, तो स्वकालीन युग प्रवृत्तीचा प्रवक्ता असतो. युगधर्मांचा तो गतिशील वाहक असतो. येईल त्या परिस्थितीला तोंड देऊन त्या युगांतील सत्य म्हणजे युगधर्म त्यानें सांगायचा सांगतो. आजचा युगधर्म आहे समाजवाद आणि म्हणूनच मी त्याचं वाहन आहे. त्याचा मला मनापासून अभिमान आहे.

एका प्रसिद्ध उर्दू कवीला मी आपलं 'काम करून गिरनीत थकलीरं माझी मालन कामानं सुकली' हें कवन ऐकवीत होतो. प्रथम तो स्तंभित, दिङ्मूढ झाला. नंतर म्हणाला,

'क्या कहा आपनें ? मजदूरकोभी इष्किया जिंदगी चाहिये ? क्या आज मजदूरका दिलभी मोहब्बत की खुशनुमा तस्वीर देखने ललचाता है ? और वहभी अपनी घरवालीकी, हककी बीबीकी प्यारी सूरत देखने के लिये तडपता है ? इसपर तो हम लोगोनें कभी सोचाभी नहीं. हमारे दुनियामे ये चीज बिल्कुल नई है. लेकिन सहीभी है. वाह वाह भई, यह तो बिल्कुल अलगहीसी बात है.'

अन् ही 'अलगसी बात' नेमकं हेंच नि असंच माझं या तथाकथित उच्चभ्रू कवींपेक्षां वेगळं आहे.

माझ्याकडून कुणीही लिहवून घेत नाहीं. कुठल्या मोहानेंही मी लिहूं शकत नाहीं. माझी कविता माझ्यापुरतंच बोलायचं तर ती एक अति तीव्र अशी वेदना आहे. ती लिहिल्याशिवाय मोकळं मोकळंच वाटत नाहीं मला. त्या माझ्या या निर्मितीला, तळमळीला, वेदनेला कुणी कसलाही रंग दिला तरी मला त्याचं कांहीं वाटत नाहीं. पुनः लिहून ती केवळ दप्तरांत ठेवून दिली किंवा एखाद्या देवळांत, क्लबांत, पार्टींत जाऊन चार दोस्तापुढं भेळ कॉफी बरोबर ठेवली कीं पुरे, असंही मला कधीं वाटत नाहीं. तर ती हजारो लोकांपुढं ठेवून आपली व्यक्तीची भावना हजारो, लाखो लोकांच्या भावनांशी ताडून पहावी असें

मला वाटते. मी तसे करतोंही पण. आणि तिथें प्रतिसाद मिळतो. कदर होते, न्याय लाभतो. हें सांगायला आनंद, अभिमान वाटतो. माझी कविता यात्र पायावर उभी आहे. आणि जोपर्यंत माझा हा पाया भक्कम आहे तों पर्यंत मला, माझ्या कवितेला डर नाहीं अन् मरही नाहीं.

१-१०-६३ —अमर शेख.

# एकच दाणा

याच ठिकाणी निर्मिला होता
दाणा मोत्याचा,
नाहीं सोन्याचा,
नाहीं नाहीं–दाणा ज्वारीचा
माझ्या निढळाच्या गाळून घामाचा
एकच थेंब,
एकच थेंब,
ढवळ्या पवळ्याच्या दमल्या मुखांतुन
पडल्या फेसाचा, तोही अगदीं एकच थेंब
एकच थेंब,
नक्षत्र मृगाच्या मुखांतुन पडल्या
पर्जन्याचा पण एकच थेंब
एकच थेंब
मिसळून निर्मिला एकच दाणा
नाहीं सोन्याचा नाहीं मोत्याचा
दाणा ज्वारीचा
मीच निर्मिला
दाणा ज्वारीचा मला म्हणाला,
जातों बाजारी
उद्यां दुपारीं
पडेल घशाला
कोरड तुझ्या

कुणबी राजा
पडूं दे चरणीं
लागूं दे कारणीं
देह माझा
दाणा ज्वारीचा
हंसला खुद्कन्
गेला लखकन्
चमकन पुढून
गेला बाजारीं
आणि शेजारीं
येऊन पडला
पैसा अर्धा
अर्धा पैसा
घेऊन कैसा
दिवस उद्यांचा जगेन मी?
चीड, संताप, त्वेष आपोआप
आले चालून.
आली चालून
दया कींव
ज्यानें आपला विकून जीव
माझ्यासाठीं
माझ्यासाठीं? जगासाठीं
केलें बलिदान
आपली मान
कुठल्या गुदामांत

लटकून फासांत
असेल घेतली,
शरम वाटली माझ्या मनाला
आणि जीवही व्याकुळलेला
माझ्या भुकेनें
दुहेरी व्यथेनें
उठलों चवताळून.
थेट गुदामाच्या निघालों दिशेनें,
तोच दाणा दिसला मला
मीच निर्मिला
कोपऱ्यांत बाजूला
होता पडला
कुजला सडला
अगदीं होऊन अर्धा मेला
अर्धा पैसा फेकून दिला
तोंडावर त्याच्या
गुदामवाल्याच्या
गुदामवाला हंसला गालीं
आणि म्हणाला, टाक दलाली
टाक दलाली, पैसा अख्खा.
पैसा अख्खा ?
नवल ऐकुनी बसला धक्का
माझ्याजवळी कुठला रुक्का ?
व्यापारी तो होता पक्का
निर्लज्जपणें सांगे बोका

" वीक बायको आतां लेका "
ऐक जरासें
होई शहाणा
मिळेल दाणा
तुझा तुला मग
झाली तगमग भाषण ऐकून
उठलें डोकें गेलें भडकून
परंतु पडलों होतो अडकून
कायद्यांत मी
असहायपणे.
असहायपणें दाणा पडला
गुदामांत जो होता सडला
धाय मोकलून मनांत रडला
त्याचा एकच अश्रुबिंदु
माझ्या पुढ्यांत येऊन पडला
क्षणभर मी दिङ्मूढ जाहलों
क्षणांत पण सावरला गेलों
आणिक उठलों तसा निघालों
त्याच ठिकाणीं
त्याच ठिकाणीं
याच ठिकाणीं
येथें येता
काळिसांवळी धरती माता
प्रगट होउनी मला म्हणाली,
" सोड पाडसा भ्रांती, चिंता

देईन दाणा तुझा तुला मी
अगदीं नामी
ज्या दाण्यानें तूंहि जगशील
जगा जगवशिल,
देईन ऐसा अमोल दाणा
होई शहाणा।
आणि दलाला हातीं
देऊं नकोस राजा
त्याच्या माना ”
एक शब्द तो
शब्दहि एकच
तो मातेचा कानीं आला
दलाल मी हद्दपार केला
आणि लागलों मग कामाला
निर्धारानें
भक्कम नांगर हातीं घेतला
एकच दाणा निर्मायाला
निर्मायाला एकच दाणा
एकच दाणा
नच सोन्याचा
नच मोत्याचा
दाणा तो केवळ ज्वारीचा
एकच दाणा
एकच दाणा

□□□

## पेटत नाहींत कशीं हीं मनें ?

पेटत नाहींत कशीं हीं मनें
कां मनेंच हीं मरुनी गेलीं ?
फत्तरही पण उलतो फुटतो
परिस्थितीशीं टक्कर देतां
मनें कशी हीं पेटत नाहींत
सांगा मजला कुणि समजावुन
पाण्याचें वाहणेही संपलें ?
काय वात वाहता संपला ?
सूर्याचें का तेज संपलें ?
संपलेंच चैतन्य जगांतिल
हेंहि कुणी तरी समजुनि सांगा
खरें आहे, पण समजुनि सांगा
मूढ बनूनि मी विचारितों हें
दुःख पाहूनि पर्वतमय हें
थिटा त्या पुढें एव्हरेस्टही
थिजून गेला
लाजेनें तो चूर जाहला
पार गारठून गेला अगदीं
फिका पडे तो त्याचा चेहरा
अगदिं पांढरा फटफटीत अन्
गंगा यमुना झरति सारख्या
भरूनी दुथड्या

क्रमांक ....१६२८.... नों. दि. १५/८/५८

उसंत नाहीं त्या नेत्रांना
असमर्थ ठरे गंगामाता
दुःख जगांतिल धुवुन काढण्या
गंगा मातेपुढेंहि आहे
एक प्रश्न हा
त्याचमुळें ती बनली दिङ्मूढ
थिटे ज्यापुढे पर्वत सागर
थिटे गगन हें अनंत वरलें
काळ ज्यापुढें हात टेंकतो
थोडीहि गति घेतां ज्याला
खडी सलामी निसर्ग देतो
कां तो मानव पेटत नाहीं?
दुःखाला या आग लावुनी
भस्म करुनि कां टाकित नाहीं?
कानमंत्र कां कुणी दिला त्या
बन दगड तूं अगदीं फत्तर
निर्गुण आणि निरंकार हो
निराकार अन् निर्विकार हो
पण मानवी मनें कशीं हीं
बनतिल फत्तर?
फत्तर होतील त्या वेळीं तीं
मेणहि असतील
पाणी असतील ती ज्यावेळीं
त्यावेळीं तीं आगही असतील
दिसतील विझली धुमसत रहातील

९३४८१ दा. क.

धुमसतील पण वेळेवरती
पेटहि घेतील
कडेलोट दुःखाचा होता
अजुनि कशीं तीं पेटत नाहींत
पेटत नाहींत कशीं ही मनें
कां मनेंच हीं मरूनी गेलीं ?

□□□

## भारतरत्न कर्वे यांसी

तुला पाहुनी वाटे मजला
तुजसम मीही ताठ रहावें
पुरें शतक दावूनि वांकुल्या
यमास तुजसम मी हिणवावें
मातेचे कोमल मन मजला
अगदीं तुझ्यासारखें मिळावें
कोट्यवधी अबला भगिनींचे
प्रबळ करांनीं अश्रु पुसावे
शुष्क करांतुन सदा मिळावी
तुजसम मम बाहूंना शक्ती
तुझ्याप्रमाणें मीहि शिकावी
रात्रंदिन मानवता भक्ती
शंभरींतहि रसरसलेले
मर्द मराठी मन तंव घ्यावें
तुजसम लाभुनि आवाज करडा

तुजसम दिल्लीश्वरा बजवावें
तुजसम कणखर होउनी निर्भय
निष्ठुर सेवाव्रत मी घ्यावें
कोंपऱ्यांतल्या उदबत्तीगत
परिमल देतच जळत रहावें

□□□

## जलधारांनो

हे माझ्या प्रिय जलधारांनो, भिजवुनि टाका हिला
ओलेतीचा शुद्ध रंग द्या नव्या छुमक छकडिला
ही पहांटेची कळी उमलती
स्वप्नि धुंद अजुनिही दिसे ती
स्वप्नांतच चालली ठुमकती
दंव बिंदूंचा शिडकाव करा जरा जागवा तिला
हे माझ्या प्रिय जलधारांनो, भिजवुनि टाका हिला
अग्नि प्रीतिचा हृदयीं फुलला
म्हणुनि हिचा चेहरा व्याकुळला
दिसे जीव तगमग झालेला
मुसळधार क्षणभरी वर्षवा शांतविण्या अग्निला
हे माझ्या प्रिय जलधारांनों, भिजवुनि टाका हिला
माझ्या मनिंच्या जलधारांनो भरून घ्या पिचकारी
नवी नवेली नार समोरी भुलवित राधा प्यारी
बहुतृषार्त ही मैना फोडित पहाटेची ललकारी
मज पाहूं द्या भिजली राधा आला बहर प्रीतिला.
हे माझ्या प्रिय जलधारांनों, भिजवुनि टाका हिला

□□□

# ढोंगी

जेव्हां माणूस चालूं लागतो
रस्ता कापीत अजाण बनुनी
असहायपणें
आपल्यामधून अनंताकडे,
अचेतनागत,
पण झेपावत
भावी युगांतील रॉकेटहुनीही तीव्र गतीनें
आम्हीही चालत असतों तेव्हां
जड देहाला त्याच्या घेऊनि
खांद्यावरुनी, ढकलत ढकलत
कसें तरी सरणापर्यंतच.
तितक्यांत मग जाणीव होते
धडकी भरते
मनांतले माझ्या आंदोलन
घालमेल अन् अश्रू नाटक
पाहिल बेटा सरणावरुनी
उठून बसुनी
हातीं निखारे जळते घेऊनि
जळतां जळतां डोळे रोखुनी
फेकील मजवर,
आणि खरोखर
येतो तोही अनंतातुनी झेंप घेउनि
चितेमध्यें साकार होउनि

लाल अग्निची जीभ काढुनी
भेडसावुनी
दांत खाउनी
पुटपुटतो ढोंगी लेकाचे
अहंकारी अन् नाटकवाले
स्वहस्तेच स्वतःची कवटी,
पिस्तुल रोखुन घेतो फोडून
आम्ही मात्र मग धूम ठोकतों
फट्टदिशी आवाज ऐकुनी
पिच्छा पुरवित येती शद्व पण
मी सुटलों या नाटकांतुनी
विकट हास्य पण ये त्या मागून
हः हः हः हः हः हः हः हः

□□□

## धन्यवाद

मोजित आहे आज तारका
आकाशांतील एकूण सगळ्या
फक्त हाताच्या बोटावरती
एक दोन तीन चार
एक दोन तीन चार
होय मीच तो
मीच मोजितों
गगन तारका
डोक्यावरचे केस मोजणें

अगदीं सोपें
डोकें असतें हातांत आपुल्या
अन् डोक्याला असलें टक्कल
मोजायाचा प्रश्नच नाहीं
हवी कशाला तेथें अक्कल ?
मात्र तारका आकाशांतिल
मोजुनि दावा
अवघड अगदीं
कठीण मोठे
मक्ता घेऊन शहाणपणाचा
मनोंमनीं तुम्ही म्हणाल मजला
'वेडा बेटा'
म्हणा बापुडे
मजगत वेडे तुम्हीहि आहां
विसरूं नका हें
'आज मला तो दिलीप दिसला
अशोक होता समीप बसला
मधुबालेला बघून हंसला
निम्मीचा तो सर्दी खोकला
तुम्हां कसा हो येऊन भिडला ?'
हे तारे का तुम्ही तोडता
कां नसता संबंध जोडता ?
मज वगळा जग आहे वेडे
हें नाहीं का आम्हांस कोडें
नसेल असलें वेड तुम्हां तर
धन्यवाद घ्या माझे शंभर

□□□

## पाथरवट

जुनाट इमला झाला सारा पाडून टाका
देऊन धक्का
आज इमारत जुनाट झाली
जीव अकारण मरतील खालीं
म्हणुनी आधीं या पाडूनी टाका
देउनी धक्का
मारा हाका जमवा लोकां
लोकशक्तिचा साधुनि मोका
पाडून टाका
आणिक बांधा नवी इमारत
पाथरवट मी नव्या युगांतील
आहेच सोबत
असेन जरि मी अज्ञ रांगडा
एक दगड तरि घडुं द्या रे या माझ्या हातुन
एक छन्निचा एक घांव तरि
बसुं द्या माझा त्या दगडावर
मानवतेचें नवीन मंदिर
येथें बांधा या जागेवर
टाळा धोका
जुनाट इमला झाला सारा पाडुन टाका
देउनि धक्का

□□□

# एकच ठेविन

आतां आहे समोर माझ्या
प्रचंड पर्वत त्याला उडविन
बांध घातला आहे त्यानें
त्याला आतां क्षणांत तुडविन
जीवन- सरिता झुळझुळ वाहति
तिला आडवाया हा आला
आडवा आला त्या रोधाया
समर्थ मानव उभा ठाकला
बांध घातल्यानें जर होईल
अवघें जीवन पवित्र मंगल,
तरीहि मी थांबवीन आपुली
माझी चालवलेली दंगल.
बांध घातला परि नच औषध
घाण गाळ कीटकही माजले
शेवाळ तसें दुर्गंधीनें
अवघें जीवन सडूं लागलें
सहनशक्ति संपली यापुढे
धडक आतां शेवटची घेईन
एक तो तरी एक मी तरी
कुणीतरी पण एकच ठेविन

# मंथन

मंथन म्हणजे घुसळण चालू आहे पाहुन भिऊं नका
मंथनांत त्या सामिल व्हारे व्हा कृतार्थ साधा मोका
भासे आंबट दहीं पाहुनी तोंडहि:आंबट करूं नका
मंथन चालू ठेवा होऊंद्यात क्षणभरी होति चुका
परी चुकाही सूक्ष्म न्याहळा पुढील टाळाया धोका
बुद्धीची रवि घट्ट धरूनि करि उभे पवित्र्यातच ठाका
लोणी आलें, नाहीं पहाण्या क्षण थांबा थोडे वाका
गळुनी गेले हात पाय हे रडगाणें तुम्हि गाऊं नका
भीष्मागत संकल्प सोडुनी प्राणपणें भेरी फुंका
परिस्थितीचें दहीं घुसळावें व्हा कृतार्थ साधा मोका.
लोणी आलें, झालें आतां सर्व संपलें म्हणूं नका
त्या लोण्याचें तूप कराया करा प्रज्वलित अग्निसखा
धैर्य चिकाटीच्या कसोटिचा तो प्रसंग आहे बाका
दसकी लडकी एक्का बोजा दहा जमविण्यासही शिका
बुद्धिची रवि रवि तेजागत तळपाया त्यांतच झोका
कढतां लोणी ठेवा उतरुनि क्षण तो निरखा दवडुं नका
केवळ सुगंध सुटतां मग वाटेल जीव हलका हलका
सुगंध केवळ सेवुनि त्यांतिल आनंदाला विकूं नका
स्वकष्ट निर्मित घृतामृताची जिव्हाग्रें गोडी चाखा
परिस्थितीचे दहिं घुसळारे कृतार्थ व्हा साधा मोका.

□□□

# नवे संत !

कवनें गातो मेलेल्यांची
श्रद्धांजली पण सदा वाहतो
स्मारकेंहि पण आम्हीं बांधितो
कृतज्ञ म्हणवुनी घेण्या जगतीं
धन्य वाटते आम्हां मनोमन
जीवन सार्थक आम्हां वाटतें
पण जे मरती क्षणाक्षणाला
फूटपाथ, न् गल्लीबोळांतुनि
बेकारीस्तव, औषधाविणा
भाकरीविणा तशीच त्यांची
इच्छा असतां जगावयाची,
दखल तयाची कधी न घेतां
मौन धरून आम्हीं कृतघ्न असतां
स्थितप्रज्ञागत झांपड लावुनि—
बसतां आम्हां, संत म्हणति जन
आमुचा इलाज नाहीं त्याला
नशीबच आमुचे आहे शिकंदर
राज्य आमुचें आम्हीं बिलंदर

## झोंपारे बाळांनो

झोंपारे बाळांनों शांत निर्धास्त
सोडारे भीति नि झोपा रे स्वस्थ
होऊं द्या सूर्याचा चंद्राचा अस्त
भीती सोडा आणि झोपा रे स्वथ
होऊं द्या रात्रही गर्द अंधारी
किर्कीर कीटक करुं द्या भयकारी
रात्रीच्या घुबडांची चालू द्या गस्त
भीती सोडा आणि झोपा रे स्वस्थ
वादळी वाऱ्यांची येऊं द्या स्वारी
डर्कालुं द्या हिंस्त्र श्वापदें सारीं
रे माझ्या बाळांनों शांत निर्धास्त
भीती सोडा आणि झोपा रे स्वस्थ
समई देहाची रक्ताचें तेल
ज्योती प्रळयांतही माझी जळेल
होईतों चिमण्यांची जीवन् पहाट.
भीती सोडा आणि झोंपा रे स्वस्थ

□□□

## अज्ञानाचें मत

मतें लाखो कोटी – मीच त्यांचा धनी
पुढारी मी गुणी – जनां वाटे
गुणांनी संपन्न – बुद्धिचा सागर
आदर सत्कार – चोहींकडे
माझ्या ना विरुद्ध – गेलें मत एक

निनादे त्रिलोक – डंका माझा
मतें सज्ञानांची – मिळालीं एकूण
तरी भुणभुण – मनीं माझ्या;
मत सोनुल्याचें – जोवर न मिळे
जीव तळमळे – तोंपर्यन्त
मला का आईला – मत तुझें बाळा
सांग लडिवाळा – प्रश्न माझा
जगाच्या मताची – बुद्धीला चिंता
भावनेचा त्राता – एक बाळ
मागतों मी तेथें – अज्ञानाला मत
सज्ञानाची पत – नाहीं तेथें
असें आहे कोडें – उकलणें नाहीं
परी सर्व कांहीं – यथायोग्य

□□□

## तारकेची कथा

लपूं मी कुठें कशी तूं सांग
पाठीं बघ कसा लागला चांद ॥
प्रथम पाहिले अन् बावरले
पळतच सुटले फुलांत दडले
तिथेंही आला छेलछबीला
लांच सुगंधाची त्या देऊन
मला आणिलें लांब
पाठीं बघ कसा लागला चांद ॥

निसटुनि गेले मग पाताळी
आला तिथें पण हा वनमाळी
मोति पाचु सागरास देऊन
तिथेंहि त्यानें फितुरि साधली
दिसे भोळसर सांब
पाठीं बघ कसा लागला चांद ॥
लपलें मग मी हिमनग शिखरीं
तिथें लगोलग आली स्वारी
हिमगिरी चरणीं अर्पुनि गंगा
अमर प्रीतिचे हिमशिखरावर
आळवुं लागला गान
पाठीं बघ कसा लागला चांद ॥
मीहि भाळले अनुनय पाहुन
अनुरुप कोण मिळे मज याहुन
छळले उगाच वाटे राहून
जीव कुशींतच दिला विसावुन
हरपुन बसलें भान
लागला पाठीं म्हणुनि हा चांद ॥

□□□

# नवसंस्कृति

करूं मी शिक्षा कुणाकुणाला
तरुणच सारा समाजांतला
सर्रास दिसे वखवखलेला
करूं मी शिक्षा कुणाकुणाला ?
नेत्र विषारी शिव्या भिकारी
कर्कश कानावर आदळती
ते हातवारे नेत्रपल्लवी
तसे अंगविक्षेपही छळती
त्यांतहि सफेद संस्कृतिवाले
ते तर अगदीं असूसलेले
शिष्ट संमतच धक्का त्यांचा
कायद्यासही धूळ चारितो
नीतीवाला राजकारणीं
डिप्लोमसी धक्क्यांत दावितो
गंधसुगंधी गळ्यांत माळा
आगळा चाळा त्याचा दिसतो.
चढतांना लोकल-बसमधुनी
विचित्र धक्का गाणीं गातो
कशाला उद्याची बात म्हणोनी
धक्का जरठपणा लपवीतो
लपवुं काय मी माझें यौवन ?
बनूं सात पडद्यांतील राणी ?
आणि तिथें बसुनि का गाऊं मी

या नवसंस्कृतीची गाणीं ?
असुनि माणुस भोग्य वस्तु मी
चिकटलेच जर मम भाग्याला
एक दिवस लावीन आग या
क्षुद्र, असंस्कृत अशा जगाला

□□□

## शुभ्र खेकडे

एके दिवशीं शुभ्र खेकडे
ओहोटीची ती वेळ साधुनी
निश्चितपणें निघुनि बिळांतुनी
जमले होते चौपाटीवर
कुणी आणिला होता चिवडा
कुणी भेळ कुणी बटाटभाजी
खमण ढोकळा भाजीहि ताजी
मिळमिळीत अन् सपक मामला
एथुन तेथुन होता सगळा
रवंथ करितच बसले होते
त्या वाळूवर शुभ्र खेकडे
एक खेकडा डोळे झांकुनि
तिथेंच अंगाभोंती फिरला
थोडा आडवातिडवा चालुन
पुनः आपुल्या जागीं आला
दुसऱ्यानें पण तशीच गिरकी
स्वतः भोंवती थोडि मारिली

उरलि सुरली उठलि मंडळी
क्षणभर तरतर थोडी फिरली
पुनः आपुल्या जागीं आली.
कौतुक भरल्या नेत्रांनीं मग
फिरल्या जागीं त्यांनि पाहिलें
दिसलें त्यांना फिरल्या जागीं
होते कांहीं लिहिलें गेलें,
हर्ष तयांना आगळा झाला
एक खेकडा
डोळे किलकिल करुनि बोलला
" पाहिलेंत हें वाक्य आमुचें
वाल्मिकीहि पण फिका त्यापुढें "
"व्यास मजपुढें खुजा," बोलला दुजा
" पहा ही माझी कविता "
तिसरा चौथा तोही बोलला
" शेक्सपीअर अन् गटे कोठला
आणा त्याला
त्याच्या साऱ्या साहित्याला "
पांचवाहि मग
पिचली छाती काढुनि वदला
" कालिदास तरी कोठुन आला ?
हंगामी खादिचें उपरणें
नाजुकपणी सांवरून पुढला
गेंगाण्या भाषेंत मुरकला
" गालिब अन् केशवसुत कसला ?

क्रमांक १५२८ नों दि: १७/५/८०

कुठल्या तो झाडाचा पाला !"
सातवाहि मग
दाढीवरूनी हात फिरवुनी
गंभीरपणें डोळे मिटुनी
आस्ते आस्ते बोलूं लागला
" रवींद्र ना तो
बंगाली गीतांजलिवाला ?
माझ्या कवितेच्या थेंबांतच वाहून गेला
मोठा त्याहुनी मीच कवीश्वर
खोटे जर वाटले तुम्हां तर
आणा ती गीतांजली येथें
जाईल वाहुन खाईल गोते
काळाच्या उदरांत क्षणांतच
राहिल माझें महाकाव्य जें
स्वप्राणें या इथें कोरलें
विस्तीर्ण अशा चौपाटीवर
साक्ष सूर्य हा साक्षी सागर "
अन् त्या नंतर
उरले सुरले खेकडेहि मग
नाचुं लागले
गगन तयां ठेंगणें वाटलें
भवभूति क्षणांत बनला कोणी
कुणि हाफिज, कुणी बनला होमर
उमर खय्यामाची दाढी
ओढून कोणी मोजी अंतर

अन् त्या नंतर
एक लाट भरतीची आली
पहिल्या लाटेसरशीं सगळीं
महान कवनें वाळूवरली
गेलीं ती एकजात पुसली
शूर खेकडे मंडळी पुन्हा
आपसुक अपुल्या बिळांत घुसलीं
समीप होता दीपस्तंभ जो
त्यांत तेवती ज्योती दिसली
" मानवांतले मूर्ख खेकडे "
पुटपुटून ती गालीं हंसली.

□□□

## प्रयोग

उगीचता सारी नाहीं हें जीवन
जीवन आहे हें प्रयोग महान
घोडा नि गाढव एकजीव झाले
प्रयोगामधून खेंचर जन्मलें
लांडगा नि श्वान एकत्र आणून
एकजन्म झाला अलसेशियन
माणूस तो वेडा वानरही मूर्ख
याच्या संयोगानें नवकवि झाला
' उगीच ' पोकळी नाहीं हें जीवन
जीवन आहे हें प्रयोग महान.

□□□

# लोकलमध्यें

असो कुणीही, होती परंतु पोक्त अशी बाई
मळकट चिंध्या कळकट चेहरा नव्हती नवलाई
तडफड धडपड करीत घुसली बसली बाजूला
'कुणास ठावें' हातवाऱ्यातुनी चेहऱ्यावर दावी
बडबड कधिमधि करी स्वतःशीं दांत ओंठ चावी
गडबड गर्दी गोंधळ सगळा चोहींकडे दाटे
गर्दी उसळून विचारांचीही फुटले त्या फांटे
कुणास वाटे कसली लोकल आहे कोंडवाडा
मला वाटलें मात्र आहे हा वेड्यांचा वाडा
हंसतो कोणी; रडतो कोणी, ओरडतो कोणी
खडखडाट गडगडाट याविण कांहीं न ये कानीं
प्रत्येकाची चेहरापाटी न्याहाळून पाही
रेघा उठती पुसल्या जाती अर्थहि त्या नाहीं
धांवत येती पुसून जाती भंवताली चित्रें
कुणी मराठी अन् गुजराथी झग्यांतलीं पात्रें
भंवतालीचा निसर्ग सगळा क्षणांत बदलून
वेड्याच्या डोक्यावत चाले लोकल वेगानें
पाहुनि सारें दृष्टि लागली माझी अंतराळीं
अंतराळीं मी माझ्याभोंती कोड्यांची जाळी
"जग हें कोडें, मीहीं कोडें, कोडें कां वेडें ?
वेड्यांनीं कां चालविलें हें जगताचें गाडें ?"
अन् इतक्यांतच गालावरती हात कुणाचासा
कोणाचा कां ? त्या बाईचाच वाजे सप्पकसा

खर्रकन खालीं आलों:खवळुनि तिच्याकडे बघुनी
दांत ओंठ मी खातो तिचिया लाचारी नयनीं
जीवन झालें असह्य नेत्रीं तिच्या मला दिसलें
चटके त्याचे सर्वा बसती तिला मला बसले.

□□□

## पाव शतक

पाव शतक धडपडतो आहे
हा जीवन–संगर जिंकाया
नेत्र उघडिले त्याच क्षणीं मी
दुःख दैन्य दारिद्र्य पाहिलें
जीवन हें लाचार अशाश्वत
असहाय असें ही अनुभवलें
बेकारी ही प्रलयंकारी
कष्ट करूनिही उपासमारी
त्या गोऱ्यांच्या राज्यामधली
या देही या डोळां पाहुन
असाच उठलों तीरावाणी
आळवाया क्रांतीची गाणीं
नाहीं लिहिली गाणीं नुसती
मैदानीं मी केली कुस्ती
झुंज दिली अन् विजयी झालों
स्वराज्य आलें घेउनि विजया
पाव शतक धडपडतो आहें
हा जीवन-संगर जिंकाया

क्षणभर मजला भास जाहला
अमोल मज स्वातंत्र्य मिळालें
धडफडीचें फळ हातीं आलें
पिळणुक गेली ब्रिटीश पळाले
परि भ्रमाचे फुटूनि भोपळे
मजला कळलें इंगित सगळें
दांडीला कडब्याची पेंडी
बांधुनिया ठेवली म्हणोनि
धांवत घोडे तिचियामागें
चकरा घेते धांवत असते
कण नच पडतां त्याच्या तोंडीं
स्वातंत्र्याची गती तीच मी
पाहुन पुनरपि उठलों आहे
उठलों तों पुनरपि झुंजाया
त्याच गतीनें गीतें गाया
प्राणपणें संगर जिंकाया
पाव शतक धडपडतो आहें
हा जीवन-संगर जिंकाया
भारत अवघा मुक्त करोनी
दाविन पाहुनि दिपेल अवनी
भारत म्हणजे नच हे डोंगर
दरी कपारी नद्या नि नाले
किर्र झाडी ही म्हणजे भारत
नाहीं नाहीं अगदीं नाहीं
भारत म्हणजे जिवंत मानव

या देशांतील चाळिस कोटी
लाचारी, दारिद्य, पिळवणूक
मिळेल त्यांना वाव न तेथें
अशाश्वतीचें नांवहि जेथें
मिळणें दुर्मिळ ऐकायाला
रोगी कुठला ? दुःखी कोण ?
मिळणें नाहीं शोधशोधुनी
अशा भारताची निर्मिती
करून दाविन मी या जगतीं
अचुक याकडे पाठ करोनी
स्वातंत्र्याची देवी निघाली
परी तयाची क्षिती न मजला
दिसे जरी मी आज एकला
उद्यांस मिळविन अनेक साथी
हात देउनी त्यांच्या हातीं
ओढुनि स्वर्गा आणिन जगतीं
वाट अचुक मी चालत आहें
तोंवर कुठली चैन जिवा या
पाव शतक धडपडतो आहे
हा जीवन-संगर जिंकाया.

□□□

## माझा देहचि धरतीमाता

माझा देहचि धरतीमाता
हा कुराण ही माझी गीता
यांतच धन, ऋण शक्ति उपजल्या
बुद्धि भावना रूप जाहल्या
        शब्दांच्या या तारेमधुनी
        जगीं एक होउनी प्रकटल्या
        प्रकाशमय हें जीवन झालें
        गूढ उकलण्या पुढें निघालें

□□□

## कर्ण आणि कुंती

आज या इथें आहे पडली
तोंडी तान्हुल्याच्या स्तन देऊनि
प्रेमळ माता रस्त्यावरती
आहे कोण ही ओळखली का ?
ही कर्णासह रस्त्यावरती
पडली पांडव माता कुंती
कुंठीत झाली काय हो मती
ऐकुन माझें विधान आगळें ?
हो ही पांडव माता कुंती
कुंतीच आहे आणि कर्ण तो
कर्णच आहे
" निर्धास्त कसा पीत पहुडला

भीतिःउन्हाची नाहीं त्याला ? ”
प्रश्नच वेड्यागत हा तुमचा
अहो कर्ण तो सूर्य-पुत्र ना ?
होईल कैसा ताप उन्हाचा ?
हां वरुणाची भीती म्हणतां ?
कशी बरें ती असेल त्याला ?
त्याच्या ह्या प्रेमळ मातेनें
वरुणच अपुल्या नेत्रिं लपवला
वादळवारा थंडी गारा
स्पर्श कसा हो करील त्याला ?
पाहिलींत का कवच कुंडलें
नव्या युगाची अंगावरली
दुग्धपान करितच कर्णानें
पहा पहा ती मूठ वळवली
कळला नाहीं अर्थ तुम्हांला ?
इंद्र कोठला बनवायाला
सांगा आतां येईल मजला
एकच ठोसा देईन त्याला
नव्या युगाचा कर्ण मी नवा
अमरत्वाचा माझा दावा
आतां सार्थच करुनी दाविन
कुठली आली पांडवसेना
इंद्रपदाला उडवून लाविन
हेंच सांगतों कर्ण त्यांतुनी
काक समाजाच्या टीकेनें

दिसते कुंती भेदरलेली
चला करूं या त्वरा
धरूं तिजवरी साउली

□□□

## तुझा नखरा बघून पांखरा

तुझा नखरा बघून पाखरा
आंमां यायला लागल्यात चकरा– रं
तुझ्या नेत्रांचं वर्णन करतां
शब्दसाठा सरे माझा पुरता
माझ्या मनांतला राघू ग झुरता
घेई पिंजऱ्याच्या गजाला टकरा–ग आमा यायला ०
सोनसळी तुझं केंस लांब
तुझ्या मांड्या ग दर्यातली वांब
देह लचके लव्हाळ्याची कांब ?
पाय नाजुक नको मारुं ठोकरा–ग आमा यायला ०
झाड लाजाळूचं तळपाय
त्यांनीं आम्हांला व्हायचं काय ?
जायबंदी होईल तुझा पाय
वैदु होईन मारिन पुनः चकरा–ग आमा ०
सोंगढोंग कराय नको लावूं
नको आंब्याच्या डोलींत गावूं
बोल एकदां मला " माझा राऊ "
आमि सायकलवरून वाटु साखरा–ग आमा ०

□□□

## आशादीप

हुश्शाऽऽऽर
दर्यावर तुफान आलंय्
वर आभाळ काळं झालंय्
अन् पिसाटला वारा
यम बडवित बसे नगारा
गाठूं पैलतीरा गाठूं पैलतीरा
बघ भवऱ्याकडं नाव निघाली
बचली बचली
सांभाळ राया घरांत घुसली
कंबर कसली
आरे ए ए ए ए रात अंधारी चुकवुं या दरबारा
आ आ आ गाठूं पैलतीरा
हातीं सुकाणूं ताठ शीड मग
भीति कसली
प्रयत्न आपुले यमरायाला
धडकी बसली
आरे ए ए ए ए आशादीपहि मार्ग दाखितो न्यारा आ आ आ
गाठूं पैलतीरा गाठूं पैलतीरा
फुटे फाटचा मंगल तारा
पसरि पिसारा
पैलथडीहुन सुगंध आणि
पहा खारा
आरे ए ए ए ए आई मराठी देईकुस उबारा आ आ आ
गाठूं पैलतीरा गाठूं पैलतीरा

□□□

# कापसाची कहाणी

ठरवले कापसानें
करावें सत्कृत्य
जन्माला येऊन
कांहीं तरीं
बनवून मानवाला
थोडेंसें सुसंस्कृत
सार्थक जन्माचें
आपुल्या परी
मानव कसला
वस्ताद बेटा
कापसाचें कापड
घेऊन अंगावर
अंतरीं नागडा
नागडाच राहिला
संस्कार संस्कृति
गेली नाट्यांत.
पुनः ठरविलें
कापसानेंही मग
येतां अपयश
विद्ध होऊन,
तंतू तंतूनीं
अलगच रहावें
ठेवावा मानव
होता तसाच.

□□□

# कलावतीस

तूं ग कशाला बांधला चाळ, कवड्या पैशांचा
तो आहे ग कर्दनकाळ रस्ता नाशाचा
तुझ्या कमरेला कक्कुचं फडकं
कधीं हेलेनचं घेतेस धुडकं
वैजयंतीचं घेतेस मडकं
नखरा मराठमोळा, त्याचा चोळामोळा, वरून फिरवून बोळा
तुझ्या भंवती ग सुटला ताळ, हौशा गौशांचा ॥१॥
पुढला शेट्या मारी बघ डोळा
जीव चवलीसाठीं उतावळा
रक्त हातीं निघे भळभळा
एका पिक्चरसाठीं एक्या लुगड्यासाठीं त्वांग केली माती
माती केलीस कलेची राळ, फडशा तमाशाचा ॥२॥
कॉन्ट्रॅक्टर बनवितोय आगळा
मॅनेजर गटारींतला बगळा
म्हेनतीचा खातो तुझ्या गोळा
झोपडी नशीबाला, दार नाहीं जिला, त्योच बंगला तुला
बटाट्याची बिसुटली चाळ, गर्व त्या फांसाचा ॥३॥
तुझी मराठ मोळी ग लावणी
कशी फुलेल गटातुरींनी
तूं ग कलावती मूळ गुणी
येग बाहेर जरा, सह्याद्रीचा दरा, घाटमाथा सारा
खुलवूं नाचून मराठीमाळ कुणबाऊ पेशाचा ॥४॥

# मोळीवाली

डोईवरती आहे मोळी
मोळीखालीं राधा भोळी
ठुमकत चाले
घेत हिंदोले
जणुं हंगामी
शिवार डोले
मोडित डोळे
निळसर काळे
जाई आगीचे
विणीतच जाळें
अर्धि उमलती कळी कोंवळीं
मोळीखाली राधा भोळी.
गेली चालुन थकुन
गला चेहरा सुकुन
अंगीं निथळती
घामाच्या धारा
वाटे धांवत जाऊन
हातीं पंखा घेऊन.
तिला घालावा
वाळयाचा वारा
खुलेल मग ती पुनः पाकळी
मोळी खालीं राधा भोळी ॥
राधा जाते दमून

खाते मोळी विकुन
आला प्रसंग
राधेला न्यारा
शाम मुरलीधरा
ऊठ हलवी धरा
आज कृष्ण तिचा
तूंच प्यारा
दावि तिला तूं दुनिया वेगळी.
मोळीखालीं राधा भोळी
दुनिया आगळी बघुन
जीव जावा फुटून
तिनं सोडावा.
प्रीत फवारा.
दोघं न्हाले जाऊन
प्रीत गाणें गाऊन
मार्ग प्रीतिचा
दावावा न्यारा
उठ सख्यारे हे वनमाळी
मोळीखालीं राधा भोळी ॥

□□□

## भरल्यापोटीं

भरल्यापोटीं सूर लागती
गोड किती अंतरीं
अर्थहीन स्वर अर्थ घेऊनि
येती सरीवर सरी
क्षणाभरापूर्वीच सूर हा
उदास वाटे कसा
वाटे गायक मरेन का हा
बसून याचा घसा
रसिकता नाहीं माझ्यांतच
म्हणतिल रसिकाग्रणी
अन्नब्रह्म अंगणींच डुलतो
नादब्रह्म सद्गुणी

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ९३४०९
संदर्भ शाखा

□□□

## चक्र मनाचें

चक्र मनाचें फिरतें माझ्या
इतकी गति या जगांत नाहीं
कृति यांतुनि मी ऐसी निर्मिन
तेच तयाची देईल ग्वाही

□□□

# काड्याच्या माड्या.

काड्याच्या माड्या बांधुनियां
नांदु नकारे त्यांमधुनीं
तुफान वादळ नकोच जातील
फुंकरी सरशीं त्या उडुनी.
वृक्षराज मी डुलतो आहे
समजुं नका जाईल पडुनी
सतत झुंजलो हंसत झुंजतो
पाय तुफानी रोवोनी.
झडती पानें, तुटती फांद्या
भरे न मज कांपरे बरें ?
जखमा वीराच्या छातीवर
पाहुनि हंसता ? हंसा खरें.
पाया भक्कम मुळ्या जरी त्या
मृदुल फुलासम दिसती तुम्हा
त्रिखंड आंवळुनि घट्ट बैसल्या
मला कुणाची नाहीं तमा.
कभिन्न काळ्या पाषाणाला
मुळ्या कोंवळ्या छेदित ज्या
त्याच मुळ्यांच्या जोरावर मी
उडविन काळाच्या चिंध्या.
जरी उन्मळून पडेन झुंजत
तरी समाप्ति नाहीं तिथें
मुळ्या हजारों वृक्ष प्रसवतील

पाय रोवतिल पुन: इथें
पण माडाच्या काड्या मेल्या
वृक्षाला हिरवळ कुठलीं
नाचवाल किति दिवस? नाचवा.
खूण अधोगतिची पटली.

□□□

## क्षयानें मेली बाबूची बहीण

क्षयानें मेली बाबूची बहीण
केशव तरणाबांड क्षयानें मेला
गेली क्षयानेंच आई बेबीची
बेबी पण मेली तीहि क्षयानेंच
तरुण बेबी
वय सोळा
झाला तिचा चोळामोळा
तिचा तिच्या तारुण्याचा
रसिक? मला म्हणती सदा
केवळ आनंद केवळ सौंदर्य
दिसेना तुला कवि मनाला
दुर्भागी बेटा.
मित्रांनो, माझ्या बंधूंनो, आयांनो,
बहीणींनो माझ्या
पहा या बेबीला लुसलुसत्या या फुलवेलीला
अकाली विझल्या उदबत्तीला

आतां कधीं जी पेटणार नाहीं
आतां कधीं जी फुलणार नाहीं
मास्तर होता बाप तिचा
एका गिरणींत मुंबापुरींत
जगतां ये ना इमानानें
जगाची रीत अनुसरली त्यानें
चोरीनें छिनालीनें जीवन जगणें अशक्य झालें
पडला रस्त्यावर
तोच नाहीं
इथलें सगळें जीवन पुष्पच
रस्त्यावर आहे पडलेलें आज
धुळींत मळत उन्हानें जळत
हुडहुडत आणि कुडकुडत कधीं
क्षयाला आपला करून साथीदार
क्षयच क्षय
गेला भरुनि जिकडे तिकडे
दिशा व्यापल्या देवागत त्यानें
स्थान एकही नाहीं सुने, क्षयावांचून
माझ्याही शब्दाला झरणीला स्वराला
होईल कीं काय क्षय म्हणून
मीही झुरणीला लागलो आहे
नाहीं नाहीं कधींही नाहीं
प्रतिकार क्षयाचा केलाच पाहिजे.
जीवनांत प्राण असे तोंवर
जगांत शाई असे तोंवर

जिभेची हालचाल होते तोंवर
घशांत श्वास असें तोंवर
शेवटचा टोला प्राणांतिक देऊन
क्षयाला ठेंचून काढलेंच पाहिजे

□□□

## क्षमा करा मत्प्रिय चिमण्यांनो

क्षमा करा मत्प्रिय चिमण्यांनों मातापितरांना आपुल्या
पाहुं नकारे केविलवाणे भलत्या काढुं नका खपल्या
क्षणसुख आमुचे लहर आमुची तुम्हांस बंदिवास दिला
जन्म देऊनि तुम्हां गुंफुनी गळ्याभोंवतीं फास दिला
तुमचें होईल काय पुढें हा विचारही नाहीं केला
'आलिया भोगी' तत्त्व मिरविले घात मात्र तुमचा झाला
केला घातच असें वाटतें जगा आजच्या पाहोनी
नाहीं शाश्वति इथें उद्याची विषाद दाटे मनोमनीं
निर्व्याज हंसे दिसे आज जें उद्यां मला तें दिसेल का ?
झळा लागुनी उद्या दिसाच्या उमलण्या आधीं सुकेल का ?
परि चिमण्यांनो लढुनी जगा जगण्यांत मौज त्या आहे बरें
सत्य तत्त्व जीवन हें शाश्वत विजयी व्हा अन् करा खरे

□□□

# मन माझं हिरवंगार

मन माझं हिरवंगार, मनची हिरवळ तयार
केली तुझ्यासाठीं पांखरा, येई विसाव्याला मुशाफिरा
येई विसाव्याला मुशाफिरा ॥
निळे निळे शार गगन दिसे मजेदार
कसा देईल आधार अन् आसरा
येईल आधार अन् आसरा ॥
छंदिफंदि बेबंदि टाक सख्या ही धुंदी
करिन तुला आनंदी मी धरा
करिन तुला आनंदी मी धरा
दिलें प्रेम मीच तुला माझ्या सुकुमार फुला
जीव गुंतला तुझ्यांत ये जरा
येई विसाव्याला मुशाफिरा ॥
तुला नभीं तारका अभिसारिका
पाठीं सारखा तुझुरा बावरा
पाठीं सारखा तुझुरा बावरा
चांद जिच्यासाठीं झुरे, तारकाहि झुरे मरे
सफल प्रेम नाहीं बरें ये त्वरा
सफल प्रेम नाहीं बरें ये त्वरा
करकर भ्रमंति केली सख्या रे अति
शिणलास तूं किती ये जरा
येई विसाव्याला मुशाफिरा
तुझी माझी जोडी खरी त्यांत गोडी
प्रीतरीत पतंगाची सख्या वेडी रे

प्रीतरीत पतंगाची सख्या वेडी रे
खरी प्रीत आनंद देई मस्त मंद गंध
जीवनीं सुगंध येई जोडी रे
जीवनीं सुगंध येई जोडी रे
याच देहीं डोळांहि अनुभव उभयतांही
लुटावया येई झणीं पांखरा
येई विसाव्याला मुशाफिरा

□□□

## मी मीन वेगळा जळाविणा

मी मीन वेगळा जळाविणा
हें दुःख हृदींचे सांगु कुणा ?
डबक्या माजी जन्म जाहला
जीव शैशवीं क्षण सुखावला
अवर्षणाची निसर्ग लीला
आत्मा व्याकुळ, तळमळला. अन्–
पदरीं तडफड, दीनपणा........
अतिवर्षण मग भयाण झालें
डबकें माझें वाहुनि गेलें
परिसरितेनें मज सुखविले
जाळे कोळयाने टाकियले
सुटला त्यांतुनि करुनि ‘ गुन्हा ’........
लाभे नंतर अथांग सागर
वाटे दैव उजळलें क्षणभर.

खरें जीवन, भयाण जलचर
सुरू जाहला नवाच संगर
आलो किनाऱ्यावरी पुन्हां........
आतां वाळू झालें जीवन
फिरे किनाऱ्यावरती वणवण
संघर्षांतच आहे उभा पण
हर्ष कोठला ? हिरमुसलें मन
त्या डबक्याच्या शोधि खुणा

□□□

## असा हा उंदीर असा हा धनिक

असा हा उंदीर
असा हा धनिक
सांगे एक मेक
साव तो मीच

फुंकर घालून
कुरतडी पाय
सांगावे काय
उंदीरच बेटे ॥
छ.ळ्या पावदर
जातो खरा पाय
झाले परीकाय
कळतची नाहीं ॥
बसे तो जाउनी

कायद्याची फुंकर
तशी ती विषारी
घाली तो मदारी
जीवनीं या ॥
विषारून टाकी
अवघे हें जीवन
मांडवली रावण
आजचा हा
बसे तो जाउनी

बिळा माझें बेटा
काढूं त्याचा काटा
कसा न कळे ॥
बंगल्यात बेटा
त्याच्या बंद वाटा
सत्तेलाही ॥

□□□

## वेडी आई

नको लढाई लादलीच तर घ्या पोराला माझ्या
देशकारणीं देतें मी एकुलता माझा राजा.
आहे काय ? माझ्या जवळी ? सौभाग्य हरवलें माझें
भर ज्वानींतच सोडुनि गेले मजला माझे राजे
राजांची जातांना होती एकच एक अपेक्षा
तळहाताच्या फोडागत करि तूं बाळाची रक्षा
वेल मांडवा लावुनि त्याची घे मग विश्रांति
बाळ लाडका वंशदीप तेवावा इतुकी भ्रांती
त्या भ्रांतीतच नाव सोडली आमुची वाऱ्यावरती
त्या भ्रांतींतच विझून गेली त्यांची जीवनज्योती
अन् अंधारीं विल्हवित होतें बाळासह नौका
वादळांतही धरला होता अंगाईनें ठेका
ठेक्यावरती जागवित होतें छोनुकलेंसें बाळ
काळ येतसे बाळ ठरतसे काळाचाहि काळ
धुणीं नि भांडीं, कधीं उपाशी पोसायास्तव त्याला
सोसाट्याच्या वाऱ्यांतच तो भर ज्वानीला आला
ओठ पिळावे, दूध निघावें मिसरुड फुटलें कांहीं
माझी वेडी माया त्यांतुन स्वप्न वेगळें पाही

फुललेली स्वप्नांत पाहिली गोरी गोरी प
हिरवा शालू, चुडा पाचुचा बसलेली लाजून
बाळ भरवितो घांस तिला ती अधोवदन झालेली
माझी जीवनसृष्टी तिचिया दृष्टींतच फुललेली
वंशज त्या पवित्र नयनीं क्षणभर चमकुनि गेला
भरुनी आलें ऊर हात मम भिडले मग नयनाला
कड् कड् कड् कड् लवे वीज अन् स्वप्न भंगले गेलें
धडपडलें घाबरलें धांवत बाळा कवटाळियलें
भीतीचा लवलेश मुखावर त्याच्या नाहीं दिसला
माझा राजा कवेंत माझ्या हळूच खुद्कन हंसला,
हंसला अन् पुटपुटला, आई-आई-जाऊं दे गे
उत्तर सीमा धगधगते मज निरोप दे गे वेगें.
जणुं ओच्याला पकडुनि माझ्या उभा दिसे मज बाळ
बाळ हट्ट तो मज आठवला, त्याचा प्रातःकाल
बाळ म्हणे, उत्तर सीमेहुनी येई गे किंकाळी
आई, लावूनि बसुं कसा गे ब्रह्मानंदीं टाळी?
उद्यां तुझ्यावर हात टाकला जातां जातां कोणी,
सांग आई तूं-- मुळमुळ गाळित बसूं काय गे पाणी?
वंशाचा मी दिवा, तुला मी फक्त काजळी द्यावी?
काजळिनें का माझ्या आई, तुझी कुस उजवावी?
नाग केवड्या मागें दडती, तुला नाहीं का ठावें?
समाजवादी फुलांमधुन हे पिवळे घेती चावे
कालच झाला स्वतंत्र भारत ज्यास्तव बाबा झटले
कारागारीं नरक यातना क्षयांत बाबा सुटले
त्यांच्या उरल्या कार्याची सांगता कराया आई

झटकन हो म्हण, आज्ञा दे गे, म्हणूं नको तूं नाहीं
हात फिरवुनी म्हटले, बाळा, नको लढाई आतां—
त्यांतच तुटला दुवा--नाहीं रे आतां कोणी त्राता
मला तरी का हवी लढाई? आई, गे तूं सांग
फुलवायाची होती ना मज स्वातंत्र्याची बाग?
बागच जाइल जळून त्यांतिल पाचोळा ना तूं-मी
आग विझविण्या जाऊं दे गे क्षण जाइल हा नामी
माझ्यागत सगळा पाचोळा जर सीमेवर गेला
आग कशी लागेल सांग उरल्या हिरव्या बागेला
मी सीमेवर नच गेलों तर बघ शेवट होईल
सुक्याबरोबर ओलेही पण जळून गे जाईल.
अन् हा पाचोळाही आई जळण्यासाठीं नाहीं
सुवर्ण-पाचोळा हा तावुन सुलाखून घेई
बाबांच्या वेळेला नव्हतीं असलीं शस्त्रें कांहीं
चालवीन रणगाडा शत्रूंच्या छातीवर आई
जिंकणार मी स्वातंत्र्याचा वारा प्याला वीर
विजयी होउनि तुझ्या कुशीची ऊब पुनः घेणार
अनाहूत स्वप्नांतच त्याची मिठी गळ्याला पडली
वेडी माया वेडी आई, वेडांतच बडबडली
नको लढाई, लादलीच तर घ्या पोराला माझ्या,
देशाकारणीं देतें मी एकुलता माझा राजा.

□□□

## बर्फ पेटला

बर्फ पेटला हिमालयाला विझवायाला चला,
वृद्ध तरुण या फक्त रक्त द्या, रे साद हांकेला
या रे द्या रे साद हांकेला ॥
घडूं नये तें आजला घडतें
स्वातंत्र्याचें बाळ रांगतें
स्वतंत्र विहराया धांवतें
बंधू चीनी सुरा घेऊनी काळ होऊनी आला ॥
रक्ताचें खत मिळतां थोडें
सीमेवरची झुडपें झाडें
देशरक्षणा बनतिल वेडे
तृणपर्णांना मिळेल शक्ती–तेच रोखतिल हल्ला ॥
रक्तलश हिमगिरीवर चढुं द्या
जनसागर सीमेला भिडुं द्या
शिरकमलें अग्नींत पडूं द्या
ध्वज राष्ट्राचा सीमेवरचा भिडुं द्या रे गगनाला ॥
पक्ष पंथ धर्म भेद सारुनि
गिळिली भूमि मुक्त करोनी
गान शांतिचें घुमवूं गगनीं
न्यायी भारत नाहिं आक्रमक दावूं या जगताला ॥

□□□

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ३६०५५........ वि: ....काव्य....
क्रमांक ..........१६२८.......... नों. दि: ....१८/११/८०

# आपलें धोतर सांभाळी बा

डब्यांतला बल्ब
गेला हो चोरीला
अंधार जाहला
भोंवती सारा ॥
हँडल आरसा
ट्यूब पळवीला
सांगूं मी कुणाला
मंत्र्याला का? ॥
त्यानेंही कापिला
खिसा माझा काल
कराची कमाल
झाली त्याच्या ॥
झुलत्यां पुलाचाहीं
कलकत्त्यांतील
नट पळवील
कोणी तरी ॥
कोसळेल आज
आश्चर्य जगाचे
लक्ष हो कोणाचे
वेधूं आता? ॥
ताज महालाचा
दगड पायाचा
तो पण जायाचा

नेम नाहीं ॥
नेम नाहीं कांहीं
सांगोनि अमर
आपुलें धोतर
सांभाळी बा ॥

□□□

## सत्याचे गा ओझे

सत्याचे गा ओझे
राईचे ही नाहीं
जिव्हेला तें कांहीं
पेलवेना
असत्याचें ओझे
पडे छातीवर
शब्द साठे चूर
जिव्हेखालीं
बाळ रवि आला
पहा उदयाला
पीतज्वर झाला
जन्मताची
सूर्य उगवतो
तसा मावळतो
कालचा दिवस तो
बदले ना गा

फाटलें आभाळ
दिसे दिशा दाही
ठिगळ त्या कांहीं
लावितां ये ना
गारुडीही येई
बसे तरु तळीं
पुंगी ती आपुली
सुरु करी गा
पोतडींत त्याच्या
विषारी भुजंग
डसे अंगांग
विषारले गेल
कोपऱ्यांत बैसोनी
हंसे खुदकन्
आहे तो सज्जन
दंश मुक्त
मिळे दुःखावर
रसना-साखर
औषध त्यावरी
नाहीं नाहीं
आतां सत्यासत्या
लावुनिया आग
विचाराला जाग
येऊं दे रे

□□□

# खंडाळा

उषा देवीनें दीप लाविला पहाटेंच्या प्रहरीं
दिव्य प्रकाशीं दुनिया राणी दिसे नवी न्यारी
रात्रीचे तें काळवंडलें मुख आतां नाहीं
टवटवीत हा मुखडा न्याहळा वेगळीच ग्वाही
धुकें आहे पण धुरकटलेले मुळीं दिसत नाहीं
धुकें भासते या हिरवळीवर स्वप्नाची साई
अथवा दुनिया राणीच्या या अधुऱ्या स्वप्नांची
रेंगाळत राहिली पाउलें साक्ष असे त्यांची
साक्ष हवी तर पुनः विचारा या तृणांकुरांना
त्याच स्वप्नीं धुंदल्या रंगल्या झवल्या नयनांना
नयनीं त्यांच्या नीर नव्हे छंदी वेडे पीर
आनंदाश्रू ढाळित डुलती झुलतीं चौफेर
फेर धरी ही दरी कपारी हिरवें नेसोनी
सोनसळी नाजुक किरणांचा बुरखा ओढोनी
बुरखा घेउनि दुनिया राणी उचलि पावलांना
लचकत मुरडत टाकि पावलें गात यक्ष गाना
पावलांत लय होता, होती लयहि पावलांना
भात शेतिवर डुलती लोंब्या गात शीळ गाना
घुमे शीळ तो डोंगर माथीं थरारली गेली
थरारली स्वागतार्थ आतां सेनाहि सजली
पहा येउनी उभारुनी खांद्यावर माथ्यांच्या
तिरंदाज सुळक्यांच्या फितिवर झालरि मोत्यांच्या
सुवर्ण केशी मुकुट शिरी वर चंदेरी पाणी

पाणी वाहते अंगांगावर गात यक्ष गाणीं
गर्द झाडीचे कधीं मधीं खोवले तुरे न्यारे
बालकवींच्या गालीचांचे झगे करुनि या रे
यक्षागत स्वर्गांतुनि कोणी झेपावत येई
जणुं हो बाळाला क्रीडांगणि जाण्याची घाई
अशी शेंकडों बाळें घेती उड्या कड्यावरुनी
मऊ गादीवर पडतां हंसुनी उठती खळखळुनी
आला आला रविवर, भास्कर आला उदयाला
डोंगर माथा स्वागतिं सुळका कडेकोट सजला
दुनिया राणीच्या दरबारीं येण्या असूसला
असूसला तो रवींद्र क्षणांत दिसे न कोणाला
यारे आला मेघ रुपेरी दडता कां वाया
होइल तुमचीही पण आतां चंदेरी काया
मी तूं मधलें अंतर जाइल क्षणांत लोपून
इथे एकला जीवहि जातो हर्षें हरखून
एकलेपणा चंदेरी जगतांतिल हा आगळा
जन्मोजन्मींचा शीणवटा निवारील सगळा
खालीवरती इकडे तिकडे चंदेरी मेघ
खेद खंत दुःखाची नाहीं इवलीही रेघ
विसरतोंच मग मीलन दुनिया राणीचा सोहळा
पऱ्या भरविती आपुल्या भोंती ज्ञानीचा मेळा
मेळ्यांतच त्या जाल रंगुनी आणि व्हाल दंग
न हो रविउदय म्हणाल ना हो मधुर स्वप्नभंग
स्वप्नांतच बरसतील सरिवर आनंदाच्या सरी

भिजुनी ओले चिंब होउनी पडाल मग भूवरी
भूवरि पडुनी भोवऱ्यांतल्या बेशुद्धिसारखें
बडबडाल मग खंडाळा मज होऊं नये पारखे

□□□

## गध्याचेंही धरिन पाय मी

तत्त्वासाठीं आहे उभा मी
तत्त्वासाठीं मरेन कटुनी
गध्याचेंही धरिन पाय मी
तत्त्वासाठीं लोळण घेईन
आणिक साधिन हित जगताचें
प्रसंग आला धोका देईन
अर्थ बदलुनी शब्दांचेंही
अर्थ नीतिचाही मी बदलिन
अंतिम सत्त्यासाठीं सगळ्या
नीतिनियमां उडवुनि लाविन
वेंचिन जीवन त्यासाठीं मी
उभा राहिला मानव पाहिन
सुख निर्माया राबुनि निशिदिन
प्रबल करांची खाणच खोदिन
रडणाऱ्यांचे अश्रु पुसाया
लढणाऱ्यांना रक्तहि देइन
अश्रू निर्मात्या वर्गाचा
निःपातच मी करून दाविन
सुख दलितांचें, दुःखीतांचें

या देहीं या नेत्रीं पाहिन
महापूर बुडवील झोपडी
कोटि करांनी त्याला रोधिन
छपरावरती कडा कोसळे
कृष्ण बनुनि मी त्याला थोपिन
राधा बनुनी प्रेम करिन मी
बनुनि यशोदा कृष्णा पाजिन
दुधांतुनी त्या देइन गीता
भ्रातृ-कौरवी सत्ता उडविन
कंसाच्या सत्तेला लत्ता
समृद्धीचें गोकुळ दाविन
फुलवाया बगिचा हर्षाचा
वर्षाऋतु मी क्षणांत होईन
रिझविल जो जनगीत गाउनी
कोकिल-स्वर सह वसंत देइन
उरल्या सुरल्या शब्द संचया
लोक शाहिरा तुलाच अर्पिन
जिद्द नि ईर्षा मर्दाची पण
मर्दालाही मुजरा देइन
या कायेचे करुनी जोडे
त्या देवाच्या पायीं घालिन
मानवदेहीं असूनिही जो
स्वर्ग मानव चरणीं आणिल

# माझी माय आहे मरहट्टी

माझी माय आहे मरहट्टी
ती माझी मी तिच्याचसाठीं
तिनें मजवरी जीव लाविला
मी ओवाळुनि जीव टाकिला
तिचे नि माझें अभंग नातें
धजे कोण त्या तोडायातें
जरा तिचा अपमान जाहला
रोधिन मी त्या कळिकाळाला
श्वान मांजराला रे कोणी
नका ‘ बोलवूं ’ मराठींतुनी
श्वान मांजरासाठीं कांहीं
माझी माय मराठी नाहीं
वीर रसाची वहाती गंगा
थोपवि सह्याद्रीच्या रांगा
तेववि सह्यगिरी माथ्यावर
शृंगाराची ज्योति नवथर
भक्तिरसाचा मळा फुलवुनी
गाते मानवतेची गाणीं
स्वातंत्र्यप्रिय माय मराठी
विलसे जिजा-शिवाच्या ओठीं
स्वातंत्र्याची भाषा कांहीं
स्वार्थ परत्वें आपुली नाहीं
राघू मैना घरीं आणुनी

देती पाठ मराठी कोणी
" म्हणा विठ्ठला, म्हणा विठ्ठला
राघू मैने, बोला, बोला "
अन् समजा राघू मैनेला
बोल तुम्हीं आपुला शिकविला
म्हणुनि कधीं वाटेल जिव्हाळा
त्या पक्षांच्या आम जातिला ?
राघूमैनेसाठीही पण
वापरूं नये भाषा आपण
लखलाभ तयां त्यांची बोली
त्यांत अस्मिता आहे आपुली
हक्कावर कोणाच्या कोणी
जगूं नये रे बांध घालुनी
हेंच शिकविते माय मराठी
म्हणुनिच ती मम ओठीं, पोटीं.

□□□

## सून सुभेदाराची नाचुं द्या

सत्य पळालें जगांतनी या
लावा या जगताला आग
श्रमास नाहीं कवडी किंमत
माणुस-हिंमत झाली खाक
रेती-मातीलाही मोल
कवडी आज़ आहे अन्मोल
अन्मोल असे झरती आंसू
भावनांचि पण जळते बाग

सत्य पळालें जगांतुनी या
लावा या जगताला आग
जाइ पवाडा, नको शिवाजी
हवी लावणी नि रावबाजी
सून सुभेदाराचि नाचुं द्या
आणूं नका नीतीला जाग
सत्य पळालें जगांतुनी या
लावा या जगताला आग
मुनिवर गेले, चिंतन गेले
ढोंग धत्तुरे येथें उरले
संत महंत नि त्यांचे चेले
धन-सत्तेचे हंडीबाग
सत्य पळाले जगांतुनी या
लावा या जगताला आग
गर्ता गेली गर्ते माजी
शिंदळ वाचाळी बेलाग
लंपट ओलेता कवि म्हणतो
जाळा अमर कवीची बाग
सत्य पळाले जगांतुनी या
लावा या जगताला आग

□□□

## तुफानांत

आज:दर्याला आलंय तुफान रं
लावुं नको होडी किनाऱ्यावरी
घालुं पिंगा तुफानी छान रं
तुझि माझी जोडी ठरूं दे खरी ॥

होते पारख तुफाना मधीं
असं तुफान येतंय कधीं
घेई नांगर उचलुन आधीं
खोल दर्यांत घुसुन प्रीत होडिंत बसुन
खेळुं दर्याची घेऊन आन रं
लावुंनको होडी किनाऱ्यावरी ॥
गेलं सोडुन तुझे साथीदार
केलं तुफानानं चंक्कांचूर
उरला तू अन् मी होऊं म्होरं
झुंजु लाटासंगं उभी तुझ्या म्हागं
दावूं कोळ्याचं आपलं इमान रं . . .
लावुं नको होडी किनाऱ्यावरी ॥
जन्म दर्याच्या उदरांत झाला :
सारा दर्या लुटुन वर न्हेला
असा पिंड आहे पोसलेला
आज त्यालाच भेऊन जायाचं का आपुन?
तरूं न्हाईतर मरूं हीच शान रं
लावुं नको होडी किनाऱ्यावरी ॥

□□□

## निर्मिती पाठीं

कोपऱ्यांतल्या बंधू भगिनी
निढळाच्या घामानें भिजल्या
थिजल्या सर्व दिशा हें बघुनी
रक्त आटते निर्मिति साठीं

निर्मितिसाठीं हात, शरीर अन्

होते नव्हते मनही झिजले
आज क्षुधेनें सारे थिजले
हात शरीर अन् मनहि न उरले
प्रचंड ऐशा निर्मिति पाठीं
निर्मिति व्हावी ज्याच्यासाठीं
त्याच जीवनाची घ्या माती
आज चालली हातो हातीं

□□□

## रूमानियन कमलिनीस

तुवा दिला मज दिवा कमलिनी
दगड दिला मी तुला
क्षण एकच तो अमर जीवनीं
भरूनिया राहिला
ज्योत दिली तूं दिव्यांतुनी अन्
प्रकाश मज दाविला
मी दगडावरि प्रहार करुनी
तुला दाविली कला
प्रकाश तो तव समाजवादी
विचार दावी मला
कला संस्कृती माझी, मानव—
विकास दाविल तुला
विकसित मानव विचार-धागा
घेउनिया चालला
सुवर्णयुग अपसूकच चालत
येइल या भूतला

तुवा दिला मज दिवा कमलिनी
दगड दिला मी तुला
क्षण एकच तो अमर जीवनीं
भरूनिया राहिला

□□□

## अंकगणित

आनंदाला भागुं नका रे रुपये, पैसे, नोटांनीं
पदर फाटुनी जाइल सगळा शून्य, भोपळा खोटांनीं
भागायाची हौस तुम्हां तर दुःखाला भागुनि टाका
समाज गंगा वहाते केवळ तो साधायास्तव मोका
उणा होऊं द्या क्षुद्रपणा, पण वेरिज होऊं देउं नका
हवीच बेरीज करावया तर, आपुली सद्भिरूची झोका
सरळ सोट पण बरवे कधिहि गणित व्यस्त हें नका करूं
अंकगणित हें दोन घडीचे केवळ आनंदेंच भरूं

□□□

## माझी आई

होय तीच ती माझी आई–माझी आई
ती ताटकळत उभी आहे जी
नाक्या नाक्यावर दिसते ती
गलिच्छ दुबळी दिसते बाई
होय तीच ती माझी आई–माझी आई
शिवार फुलल्या आटोंळ्यावर
पदर खोंचुन निर्भय–सुंदर

दा. क्र. १३५९९

गोफण गुंडा भिरकवु पाही
होय तीच ती माझी आई–माझी आई
या आडावर, त्या विहिरीवर
भरली घागर ओढी भरभर—
भोळेपण भरभरुनी नेई
होय, तीच ती माझी आई–माझी आई
घडा मातिचा डोईवरती
फुटेल का ही सदाच भ्रांती
थांबत, ठेचाळत जी जाई
होय तीच ती माझी आई–माझी आई
भल्या पहाटें उरकुनि सारे
निघे घरांतुनि पिसाट वारे
कामावर जाण्याची घाई
होय तीच ती माझी आई–माझी आई
उभी आहे धनिकाच्या दारीं
सचिंत, बांधुनि लज्जा पदरीं
माझें, मीपण विसरुनि जाई
होय, तीच ती माझी आई–माझी आई
अशीच भटके दारोदारीं
लावुनि तन–मन या संसारीं
[illegible]रवी उमगत नाहीं
अशीच आहे माझी आई–माझी आई
(प्रो. बन्सीधर पंडा– 'मेरी माँ है.')

REFBK-0013491
REFBK-0013491
मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...३७०५५... वि: ...काव्य...
क्रमांक ...१६२८... नों. दि. २०/८/७४.

□□□